INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 5 | JUNE - 2023

# "हिंगणघाट तालुक्यातील माध्यमिक शाळेतील भूगोल विषयाच्या अध्यापनात शैक्षणिक साधनांचा परिणामकारक वापर - एक अभ्यास"

डॉ. जी. व्ही. जैन
माजी सहाय्यक प्राध्यापक, शिववैभव शिक्षण महाविद्यालय, वर्धा.



शिक्षण ही जीवनाची गुरूकिल्ली आहे. शिक्षणामुळे जग प्रगतीकडे वेगाने धावू पाहत आहे. शिक्षणाचा आधार घेवून वैज्ञानिक प्रगती साधली जात आहे. प्राचीन काळातील आदीमानवापासून ते आजच्या विज्ञान युगातील प्रगत मानवाचे रूप हे मानवी जीवनात घडलेल्या उत्क्रांतीचे द्योतक आहे. आदीकाळात गुहेत राहून मानव कंदमुळे व कच्च्या मासांवर आपली उपजिवीका भागवित असे. सतत चालणाऱ्या या प्रक्रियेमुळे सामाजिक तसेच सांस्कृतिक गरजानुरूप शिक्षण प्रक्रियेच्या ढाच्यात बदल होत गेलेले आहे. हया बदलामुळे तत्कालिन व्यक्ती, व्यक्ती समूह, समाज काळाच्या आव्हानांना समर्थपणे सामोरे गेले. भारताच्या प्राचीन गुरूकूल पध्दतीपासून ते आजतागायत दिल्या जाणाऱ्या शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा बौध्दिक, भावनिक, कौशल्यात्मक विकास घडवून आणणे ही त्रिसुत्री वापरली गेली.

## संशोधनाची गरज :-

विद्यार्थी ज्ञान निर्माता झाला पाहिजे, हे NCF चे उद्दिष्टचे आहे. अभ्यासक्रमात २००४ मध्येही यावर भर दिलेला आहे.

महानगरपालिकेच्या शाळेचा जर आपण विचार केला तर असे दिसले की, या शाळेत शिक्षण घेणारी मुले ही सर्रास साधारण कुटूंबातील व सामान्य जीवन गतीमान करणारी असतात. असे असले तरी ही साधारण कुटूंब म्हणून साधारण बुध्दिमत्ता असे नाही. या महानगरपालिकेच्या शाळेतही अनेक भावी विद्वान, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक किंबहुना शिक्षक दडलेले आहेत.

## संशोधनाचे महत्व :-

प्रसिध्द भूगोल तज्ञ 'फेअरग्रीव्ह' यांच्या मते भूगोल ९९टक्के नकाशाव्दारे शिकविला जावू शकतो. नकाशाप्रमाणेच भूगोल विषयात वेगवेगळया प्रकारच्या अनेक आकृत्या, प्राणिचित्रे, भुचित्रे, फोटो, आलेख, तक्ते, प्रतिकृती, नमुने, विशेषत: दृक-श्राव्य साधने याचाही समावेश होतो. यासर्व बाबी फक्त पुस्तकातून पाहून विशेषरित्या समजत नाहीत आणि त्यामुळे चुकीचे संबोध निर्माण होतात. म्हणूनच सद्य स्थितीनुरूप भूगोल विषयात शैक्षणिक साधनांचा वापर करणे गरजेचे आहे.

## समस्या विधान :-

"हिंगणघाट तालुक्यातील माध्यमिक शाळेतील भूगोल विषयाच्या अध्यापनात शैक्षणिक साधनाचा परिणामकारक वापर - एक अभ्यास."

## कार्यात्कम व्याख्या :-

१. ***माध्यमिक शाळा*** – इयत्ता ८ वी ते १० वी असणारा स्तर म्हणजे माध्यमिक शाळा होय.
२. ***शाळा*** – अध्ययन अध्यापन करण्याचे ठिकाण.
३. ***भूगोल विषय*** – अभ्यासक्रमातील एक महत्वपूर्ण भूगोल हा विषय आहे. भूगोल हे एक शास्त्र असून भूगोल हा गतिमान विषय आहे.
४. ***अध्यापन*** – अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी चेतना, मार्गदर्शन, दिग्दर्शने व प्रोत्साहन होय.
५. ***शैक्षणिक साधन*** – अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रभावी करण्यासाठी शिक्षकां कडून वर्गअध्यापनात ज्या साहित्याचा वापर केला जातो त्यांना शैक्षणिक साधन असे म्हणतात.
६. ***वापर*** – एखाद्या कृतीमध्ये एखादया गोष्टीचा अर्थपुर्णपणे केलेला उपयोग म्हणजे वापर होय.
७. ***परिणाम*** – संशोधनाच्या अंतिम टप्प्यात लेखनाव्दारे दिसून येणारा लक्षणिय बदल म्हणजे परिणाम होय. .
८. ***अभ्यास*** – विशिष्ट ध्येय प्राप्तीसाठी मानसिक चिंतनात्मक, शोधात्मक व निरीक्षणात्मक क्रिया म्हणजे अभ्यास होय.

## संशोधनाची उद्दिष्टये :-

१. भूगोल विषयाच्या अध्यापनात शैक्षणिक साधनांच्या वापरात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
२. शैक्षणिक साधनांच्या सहाय्याने न केलेल्या अध्यापनाचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
३. भूगोल विषयाच्या प्रात्यक्षिकात येणाऱ्या समस्यामागील कारणांचा शोध घेणे.
४. भूगोल विषयाच्या प्रात्यक्षिकात येणाऱ्या अडचणीवर उपाययोजना सुचविणे.

## गृहीतके :-

१. भूगोल विषयाचे अध्यापन करतांना जास्तीत-जास्त शैक्षणिक साधनांचा वापर शिक्षकांकडून केला जातो.
२. भूगोल विषयाच्या अध्यापनामध्ये शैक्षणिक साधनांचा वापर करणे अपरिहार्य आहे.
३. शैक्षणिक साधनांच्या वापराबाबत समस्या येतात.

## प्रस्तुत संशोधनातील न्यादर्श :-

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी संभ्यावता नमुना निवड पध्दतीव्दारे ३० माध्यमिक शाळांपैकी २० माध्यमिक शाळा व २१ भूगोल विषय शिकवणाऱ्या शिक्षकांची लॉटरी पध्दतीने निवड केली आहे.

## प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेली पध्दती :-

संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण या संशोधन पध्दतीची निवड केलेली आहे. सर्वेक्षण पध्दतीव्दारे सद्यस्थितीचे वर्णन केल्या जाते आणि सद्यस्थिती स्पष्ट करते. वर्तमान काळात असलेले संबंध, प्रचलित परिपाठ, दिसून येणाऱ्या निष्ठा, दृष्टिकोन आणि अभिवृत्ती, सुरू असलेल्या प्रक्रिया जाणवणारे परिणाम, विकसित होत असलेले विचार यांच्याशी ते संबंधित असते.

## संशोधनाची साधने :-

सदर संशोधनासाठी संशोधकाने माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला. प्रश्नावलीत व्दिपर्यायी प्रश्न, (होय/नाही) बहुपर्यायी प्रश्न (४ पर्याय) आणि मुक्त प्रश्न ज्याव्दारे आपले मत नोंदविता येतात. अश्या प्रकारचे प्रश्न प्रश्नावलीत समाविष्ट केले असून, प्रश्नावलीतील प्रश्नांची एकूण संख्या ३२ ऐवढी ठेवण्यात आली.

## सांख्यिकिय परिमाणे/तंत्रे :-

सदर संशोधनासाठी संशोधकाने माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी, या सांख्यिकिय परिमाणाचा वापर केला.

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

सदर संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीची निवड केली व त्याव्दारे प्रश्नावली या साधनाचा वापर करून शिक्षकांकडून माहिती संकलित करून त्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले, त्यासाठी संशोधकाने शेकडेवारी या सांख्यिकिय परिमाणाचा वापर करून माहितीचे आलेखाव्दारे सादरीकरण केले आहे.

भूगोल विषय शिक्षकांकडून माहिती संकलित करण्यात आली. प्रथम साधनसामुग्री, माहितीचे पृथ्थ:करण करण्यात आले, त्यानंतर प्रत्येक प्रश्नानुसार स्वतंत्रपणे माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

## प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष :-

१. भूगोल विषयासाठी दिलेल्या तासिका कमी पडतात.
२. भूगोल विषयाच्या अध्यापनात शिक्षकांना शैक्षणिक साधनाचा अभाव जाणवतो.
३. भूगोल विषयाच्या अध्यापनासाठी शिक्षक अधिक प्रमाणात व्याख्यान पध्दतीचा वापर करतात.
४. भूगोल विषयाच्या अध्यापनासाठी शिक्षक बहुसंख्यरितीने तात्विक कार्यावरच भर देतात.
५. प्रात्यक्षिक कार्य करतांना शिक्षकांना वेळ अपुरा पडतो.
६. शैक्षणिक साधने वापरण्यास शिक्षकांना वेळ अपुरा पडतो.
७. नकाशा वाचन जरी केले जात असले तरीही नकाशावाचन करण्यास वेळ अपुरा मिळतो.
८. नकाशावाचन करण्यासाठी नकाशे पुर्णत: उपलब्ध नसतात.
९. शैक्षणिक साधनामध्ये दृक-श्राव्य साधने वापरण्यास अडचणी येतात.
१०. विद्यार्थ्याकडून नकाशावाचन करवून घेताना वर्गात गोंधळ जास्त होतो.
११. बहुतेक शाळेत वस्तु संग्रहालयाची निर्मिती केलेली नाही.
१२. विद्यार्थ्यांना प्रकल्प भेटीत अडचणी निर्माण होतात.
१३. भूगोल विषय शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविले जात नाही.
१४. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधने वैयक्तिकरित्या हाताळता येत नाही.
१५. भूगोल विषयाचे प्रदर्शन भरविले जात नाही.
१६. भूगोल विषयाला अनुसरून केवळ शैक्षणिक सहली व पर्यावरण दिन साजरा केला जातो.
१७. विद्यार्थ्याकडून शैक्षणिक साहित्य बनवून घेतले जात नाही.
१८. शैक्षणिक साधनांच्या वापरासाठी शिक्षकाकडून उपाययोजना सूचविल्या जात नाही.
१९. विद्यार्थ्यांना भूगोल विषयाच्या अध्ययनात अनेक संबोध, संकल्पना सुस्पष्टरित्या समजल्याने केवळ परीक्षेपुरतेच पाठांतर होते.

## संदर्भ ग्रंथ सूची :-


१. आगलावे, जे. सी., (१९६६), शैक्षणिक संशोधनाचा परिचय, सुलभ प्रकाशन, न्यू दिल्ली.
२. भिंताडे, वि. रा., (१९९४), शैक्षणिक संशोधन पध्दती, नुतन प्रकाशन, पुणे.
३. करंदीकर, सुरेश., (२००६), परिसर अभ्यास व भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
४. कदम, चा. प., (१९९४), शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतन प्रकाशन, पुणे.
५. मुळे, रा. श. आणि उमाठे वि. तु., (१९८५), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्याबुक्स, नागपूर.
६. पोक्षे, द. बा., (१९९८), भूगोलातील पाठयांश पध्दती, नुतन प्रकाशन, पुणे.